मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » शनिवार, दिनांक १० फेब्रुवारी २०२४ । पान १

# लोकसंख्या लक्षात घेऊन पाणी पुरवठ्याचे नियोजन

## पाणी पुरवठ्याचे नियोजन शासनाकडून करण्यात येणार

**पिंपरी-चिंचवड**

**न्यूज एक्सप्रेस मराठी।** स्थानिक स्वराज्य संस्थांनी नागरिकांना पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा आणि कलाक्षेत्रातही भरीव योगदान द्यावे, असे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी केले. यासोबतच पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या लक्षात घेऊन पाणी पुरवठ्याचे नियोजन शासनाकडून करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. महापालिकेच्या वतीने उभारण्यात आलेल्या विविध विकासप्रकल्पांचे



उद्घाटन, लोकार्पण, भूमिपुजन श्री. पवार यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमांच्या अनुषंगाने सांगवी येथील सार्वजनिक बांधकाम मैदान (पी. डब्लू. डी. मैदान) येथील कार्यक्रमात मार्गदर्शन करताना ते बोलत होते. या उद्घाटन समारंभास आमदार आण्णा बनसोडे, उमा खापरे, अश्विनी जगताप, माजी आमदार विलास लांडे, माजी महापौर योगेश बहल, मंगला कदम, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, माजी नगरसदस्य बाळासाहेब लांडगे, जगदीश शेट्टी, अजित गव्हाणे, नाना काटे, संदीप चिंचवडे, प्रशांत शितोळे, अतुल शितोळे, शाम लांडे, राजू मिसाळ, अमित गावडे, मोरेश्वर भोंडवे, राजेंद्र जगताप, कैलास बारणे, सतीश दरेकर, संजय वाबळे, पंकज भालेकर, मयुर कलाटे, शांताराम भालेकर, विनायक रनसुभे, डब्बू आसवाणी, माजी नगरसदस्या सीमा साळवे, शर्मिला बाबर, सुषमा तनपुरे, आशा शेडगे, स्वाती कलाटे, माया बारणे, महापालिका आयुक्त शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, उल्हास जगताप, पोलीस उपआयुक्त वसंत परदेशी, शहर अभियंता मकरंद निकम, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार, वैद्यकीय अधिष्ठाता डॉ. राजेंद्र वाबळे, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी निळकंठ पोमण, मुख्य अभियंता रामदास तांबे, श्रीकांत सवणे, सह शहर अभियंता संजय कुलकर्णी, ज्ञानदेव जुंधारे, प्रमोद ओंभासे, उपआयुक्त मिनीनाथ दंडवते, क्षेत्रीय अधिकारी राजेश आगळे, अमित पंडित, सहाय्यक आयुक्त यशवंत डांगे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, आपत्ती व्यवस्थापन प्रमुख ओमप्रकाश बहिवाल, विशेष अधिकारी किरण गायकवाड, कार्यकारी अभियंता हरविंदरसिंह बन्सल, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह महापालिका अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

# कमी गुण असलेल्या मुलींनाच हेरायचा नौशाद

## रावेतमधील खासगी निवासी शाळेतील प्रकारानंतर पालकांमध्ये भीती

**पिंपरी-चिंचवड**

**न्यूज एक्सप्रेस मराठी।** रावेत येथील क्रिएटिव्ह ॲकेडमी या खासगी निवासी शाळेतील शालेय विद्यार्थिनीवर वेळोवेळी लैंगिक अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार नुकताच समोर आला. या प्रकरणी ॲकेडमीचा संचालक नौशाद अहमद शेख (वय ५७, रा. रावेत कॉर्नर, रावेत) याच्यासह त्याला मदत करणाऱ्या माजी विद्यार्थिनीला पोलिसांनी अटक केली असून त्यांना न्यायालयाने ९ फेब्रुवारीपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.या खासगी निवासी शाळेत इयत्ता आठवी ते बारावीपर्यंत शिक्षण दिले जाते. त्यासाठी पालक वर्षाला ३ लाख रुपये इतके शुल्क भरत असत. तरी मुली सुरक्षित राहिल्या नाहीत. इयत्ता दहावीतील मुलींवर लैंगिक अत्याचार झाल्याचे प्रकरण समोर आल्यानंतर पालकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. शहरातही या प्रकरणाचे पडसाद उमटले असून विविध संघटना आंदोलन करुन आरोपींना कडक शिक्षा व्हावी, अशी मागणी करत इशारे देत आहेत.कमी गुण असलेल्या मुलींनाच 'तो' हेरायचा अभ्यासात जेमतेम किंवा परीक्षेत कमी गुण संपादन केलेल्या विद्यार्थिनींना हेरून 'तू अभ्यास करत नाहीस, असे तुझ्या पालकांना नाव सांगेल', अशी भीती दाखवत नौशाद शेख त्यांच्या मानसिकतेशी खेळायचा. मग; माजी विद्यार्थिनीच्या मदतीने मुलींना फ्लॅटवर बोलवायचा. अशी त्याची गुन्हा करण्याची पद्धती होती. त्याच्या या घृणास्पद कृत्याबद्दल पालकांच्या तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. काही पालकांनी 'मिडीयाशी बोलताना त्याची मानसिकता उलगडली. या शाळेत परगावातील पालकांनी दोन फेब्रुवारीपासून येथे ठिय्या मांडला आहे. दुसरीकडे दहावी-बारावीचे वर्ष असल्याने मुलींना एकटे सोडून जाता येत नसल्याची पालकांची मानसिकता बनली आहे. काही पालक जळगाव, अहमदनगर, नाशिक, धुळे, पुण्यावरून येऊन या निवासी शाळेत राहत आहेत. त्यांना आपापल्या पाल्यांशी खासगीत चौकशी केल्यावर काही बाबी उघडकीस आल्या. एका पालकाने सांगितले की, ''कमी गुण मिळालेल्या मुलींकडे माजी विद्यार्थिनी जात असत. 'सर, तुझा अभ्यास घेतील. तुला गुण कसे मिळवायचे ते सांगतील', असे सांगून त्या दहावी-बारावीच्या मुलींना भुलवायच्या. माजी विद्यार्थिनी निवासी शाळेत विनाकारण का राहत होत्या ? अनेक मुलींबाबत असेच प्रकार घडले असल्याची भीती वाटते.'' या निवास शाळेत विद्यार्थ्यांना दाखल केल्यावर पालकांनी महिन्यातून एकदाच फोन करणे हा नियम होता. आजारी पडल्यावर देखील पालकांनी दखल द्यायची नाही. स्थानिक डॉक्टरांकडून उपचार देण्यात असल्याचे पालकांना सांगण्यात येत असल्याची माहिती बाहेर जिल्ह्यांतून आलेल्या पालकांनी दिली. या शाळेत गेल्या चार वर्षांपासून माझ्या दोन मुली भेदरलेल्या अवस्थेत आहेत. एक मुलगी दहावीत आणि दुसरी बारावीत आहे. त्यांना दिलेल्या वाईट वागणुकीमुळे मुलींना नैराश्य आले होते. दहावी-बारावीचे वर्ष असल्याने आम्ही प्रवेश रद्द केला नाही. पण; ठराविक मुलींना लक्ष्य करण्यात येत असल्याची माहिती बाहेरील जिल्ह्यांतून आलेल्या पालकांनी दिली.

# अखेर चिखलीतील वाहतूक कोंडी सुटणार!

## वाहतूक सक्षमीकरणासाठी प्रस्तावित रस्त्यांची निविदा

**मोशी**

**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

चिखलीतील वाहतूक सक्षम करण्यासासाठी प्रस्तावित रस्ते मार्गी लावण्यासाठी आमदार महेश लांडगे यांनी दिलेला 'शब्द'अखेर ठरला आहे. त्यामुळे स्थानिक नागरिकांसह सोसायटीधारकांना दिलासा मिळाला आहे, अशा भावना ग्रामस्थांनी व्यक्त केल्या आहेत.

पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीत १९९७ साली टाळगाव चिखली आणि तळवडे गावचा समावेश झाला आहे. शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत असून, चिखली-मोशी-चऱ्होली असा सर्वात मोठा 'रेसिडेन्सिअल कॉरिडॉर' विकसित होत आहे. चिखली गावाला ऐतिहासिक वारसा आहे. तसेच, औद्योगिक व निवासी क्षेत्राला जोडणारा प्रमुख दुवा म्हणून चिखलीची ओळख आहे. तळवडेत आयटी पार्क आणि औद्योगिक पट्टा असल्यामुळे मोठ्या प्रमाणात रहदारी असते. श्री क्षेत्र देहू आणि श्रीक्षेत्र आळंदीला जोडणारा रस्ता चिखलीतून जातो. चाकण औद्योगिक पट्यातून ये-जा करणारे कामगार, कष्टकरी, तळवडे एकआयडी, जाधववाडी भागातील व्यावसिक पट्टा या भागातून मोठ्या प्रमाणात चिखलीतून रहदारी होत असते. त्यामुळे विकास आराखड्यातील प्रस्तावित रस्त्यांना गती द्यावी. या करिता चिखली ग्रामस्थांनी ग्रामसभेमध्ये ठरावही केला होता. त्यानंतर मागण्यांचे निवेदन महापालिका आयुक्तांना दिले होते. तसेच, भाजपाचे आमदार महेश लांडगे यांनाही ग्रामस्थांनी प्रस्तावित रस्ते मार्गी लावण्याबाबत सांकडे घातले होते.



त्यानुसार महापालिका प्रशासनाने प्रभाग क्रमांक १ चिखलीमधील देहू आळंदी ते सोनवणे वस्तीकडे जाणारा ३० मीटर रुंद डी.पी. रस्ता, चिखली चौक ते सोनवणेवस्तीकडे जाणारा २४ मीटर रुंद रस्ता आणि इंद्रप्रस्थ मंगल कार्यालय ते संतपीठाकडे जाणारा १८ मीटर रुंद डी. पी. रस्त्याच्या कामाची महापालिका स्थापत्य विभागाने सुमारे ६२ कोटी रुपयांची निविदा प्रसिद्ध केली आहे. दि. २७ फेब्रुवारी रोजी निविदा खुली होणार आहे. त्यामुळे मार्च-२०२४ मध्ये कार्यादेश काढला जाईल. तसेच, लोकसभा निवडणुकीची आचार संहिता लागण्यापूर्वी रस्त्याचे भूमिपूजन होईल, अशी शक्यता आहे. माजी नगरसेवक कुंदन गायकवाड म्हणाले की, चिखलीचा समावेश महापालिका हद्दीत झाल्यापासून विकासापासून वंचित राहिले होते. २०१७ मध्ये महापालिकेत भाजपाची सत्ता आल्यानंतर खऱ्या अर्थाने या गावातील प्रलंबित विकासकामांना गती मिळाली. स्थानिक नागरिकांनी आमदार महेश लांडगे यांना रस्त्यांची कामे मार्गी लावण्याबाबत मागणी केली होती. त्यावेळी ''कोणत्याही परिस्थितीत रस्ते विकासाला प्राधान्य देण्यात येईल.

> **"चिखली आणि परिसरातील वाहतूक सक्षम करण्यासाठी प्रस्तावित रस्त्यांची कामे मार्गी लावावीत. यासाठी स्थानिक नागरिक, ग्रामस्थांनी मागणी केली होती. त्यामुळे महापालिका प्रशासन, जिल्हा प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा केला. त्याला यश मिळाले. आता निविदा प्रक्रिया पूर्ण करुन कामाला सुरूवात करावी. पर्यायी रस्ते निर्माण झाल्यामुळे चिखली आणि परिसराची 'कनेक्टिव्हीटी' वाढणार आहे. वाहतूक कोंडी कमी होईल आणि वाहनचालक- नागरिकांचा वेळ आणि इंधनाची बचत होईल.**
>
> **- महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

# वीजबिलांची वाढती थकबाकी खपवून घेणार नाही

## अकार्यक्षम अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करणार : अंकुश नाळे

**पिंपरी-चिंचवड**

**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

गेल्या काही महिन्यांपासून घरगुती, वाणिज्यिक व औद्योगिक ग्राहकांकडील मासिक वीजबिलांची १०० टक्के वसूली होत नसल्याने थकबाकीमध्ये वाढ होत आहे. परिणामी महावितरणची आर्थिक स्थिती चिंताजनक होत आहे. त्यामुळे मागील थकबाकीसह मासिक वीजबिलांची १०० टक्के वसूली करावीच लागणार आहे. जे ग्राहक थकबाकीदार आहेत त्यांचा नियमानुसार तत्काळ वीजपुरवठा खंडित करा अन्यथा कारवाईला सामोरे जावे लागेल, असा इशारा पुणे प्रादेशिक संचालक अंकुश नाळे यांनी दिला. प्रादेशिक कार्यालयाच्या प्रकाशभवन' सभागृहात शुक्रवारी (दि. ९) आयोजित गणेशखिंड मंडल अंतर्गत कार्यालयांच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. गेल्या तीन दिवसांमध्ये नाळे यांनी पुणे परिमंडलातील सर्व १६८ शाखा, ४१ उपविभाग, १२ विभाग व ३ मंडल कार्यालयांची वीजबिल वसूली, थकबाकी, वीजहानी व नवीन वीजजोडण्यांबाबत आढावा घेतला. यावेळी मुख्य अभियंता राजेंद्र पवार, प्रभारी महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) माधुरी राऊत, अधीक्षक अभियंता अरविंद बुलबुले, युवराज जरग, संजीव राठोड, अनिल गेडाम, उपमहाव्यवस्थापक (आयटी) अजय खोडके यांची उपस्थिती होती. प्रादेशिक संचालक नाळे म्हणाले की, प्रत्येक महिन्यात वीजबिलांच्या थकबाकीची रक्कम वाढत असताना मात्र थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित करण्याची गती अतिशय संथ आहे. हा प्रकार मुळीच खपवून घेतला जाणार नाही. 'ना नफा, ना तोटा' (रेव्हेन्यू न्यूट्रल) तत्वाने वीजसेवा देणाऱ्या महावितरणची आर्थिक स्थिती ही सर्वस्वी वीजबिलांच्या दरमहा वसूलीवरच अवलंबून आहे. त्यातूनच वीजखरेदी, नियमित व (चरहरींळींरअँप) बाह्यस्त्रोत कर्मचाऱ्यांचे वेतन, कार्यालयीन खर्च, विविध कर, दैनंदिन देखभाल व दुरुस्तीचे कामे आणि व्याजासह कर्जांचे हप्ते अशा दरमहा देणी द्यावी लागतात. ही सर्व आर्थिक भिस्त केवळ वीजबिलांच्या वसूलीवर अवलंबून असल्याने थकबाकीमध्ये होणारी वाढ खपवून घेतली जाणार नाही. पुणे परिमंडलामध्ये ७ लाख १८ हजार घरगुती, वाणिज्यिक व औद्योगिक ग्राहकांकडे सध्या १८७ कोटी ९२ लाख रुपयांची थकबाकी आहे. या थकबाकीसह चालू मासिक वीजबिलांच्या १०० टक्के वसूलीचे ध्येय ठेऊन काम करावे लागणार आहे.

# विद्यापीठाचे अमृतमहोत्सवी वर्ष संपले

## औचित्याने वर्षभरात विविध कार्यक्रम आयोजित करण्याची घोषणा

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे अमृतमहोत्सवी वर्ष संपूनही वर्षभरातील कार्यक्रमांचे नियोजन कागदावरच राहिले आहे. या वर्षात कार्यक्रम आयोजित करण्यासाठी नियुक्त केलेल्या समितीने वर्षभरातील कार्यक्रमांची रुपरेषा जाहीरच केली नाही. ऑक्सफर्ड ऑफ द ईस्ट म्हणून गौरवल्या गेलेल्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे अमृतमहोत्सवी वर्ष गेल्यावर्षी सुरू झाले. १० फेब्रुवारी रोजी विद्यापीठाला ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. अमृतमहोत्सवाच्या औचित्याने वर्षभरात विविध कार्यक्रम आयोजित करण्याची घोषणा विद्यापीठाकडून करण्यात आली होती. त्यासाठी व्यवस्थापन परिषदेचे सदस्य राजेंद्र विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्यात आली होती. तसेच वर्षभरात मराठी भाषा भवनाचे काम पूर्ण करणे, संशोधन विकास विभाग स्थापन करणे अशा काही घोषणा करण्यात आल्या होत्या. मात्र वर्षभरात कोणते कार्यक्रम आयोजित केले जाणार याची रुपरेषा समितीकडून वर्ष संपत येऊनही जाहीर करण्यात आली नाही.अमृतमहोत्सवी वर्षातील पहिले सहा महिने विद्यापीठात प्रभारी कारभार सुरू होता. त्यामुळे पहिल्या सहा महिन्यात उल्लेखनीय असे काही घडले नाही. त्यानंतर विद्यापीठाकडून बोधचिन्ह स्पर्धा, नामांकित माजी विद्यार्थ्यांचा सत्कार, अमृतमहोत्सवी उद्यानाची निर्मिती, काही परिषदांचे आयोजन, कविसंमेलन असे काही कार्यक्रम करण्यात आले. मात्र अमृतमहोत्सवी वर्षाच्या औचित्याने नियुक्त केलेल्या समितीने वर्षभरातील कार्यक्रमांचे केलेले नियोजन गुलदस्त्यातच राहिले आहे.



अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त मोठे संशोधन प्रकल्प, विद्यार्थी वसतिगृहासह हरित संकुलाची निर्मिती, नामवंत माजी विद्यार्थी सत्कार, अहमदनगर, नाशिक येथे विशेष व्याख्यानमाला असे विविध कार्यक्रम पुढील वर्षभरात होणार आहेत. त्याबाबतची सविस्तर रुपरेषा लवकरच जाहीर केली जाईल, असे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी म्हटले आहे.सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अमृतमहोत्सवी वर्षासह विद्यापीठातील जयकर ज्ञानस्रोत केंद्राच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त दुर्मीळ ग्रंथाचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. माजी सहायक ग्रंथपाल डॉ. लता गोंडे यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. विद्यापीठाचा पहिला पदवी प्रदान सोहळा, पहिला वर्धापन दिन, 'विद्यापीठ वार्ता'चा पहिला अंक, विद्यापीठाचा पहिला वार्षिक अहवाल, पुणे विद्यापीठ कायदा १९४८, विद्यापीठाला भेट दिलेल्या अनेक मान्यवरांची छायाचित्रे, ग. दि. माडगूळकर, पु. ल. देशपांडे, वसंत कानेटकर, ना. धों. महानोर अशा साहित्यिकांच्या हस्ताक्षरातील पत्रे, विद्यापीठाचे पहिले कुलगुरू बॅ. मुकुंद जयकर यांचा वैयक्तिक पुस्तकांचा संग्रह, त्यांना ६ व्या जॉर्जने प्रदान केलेले पदक, केंद्राच्या पहिल्या पाच ग्रंथपालांचे छायाचित्र यांचा प्रदर्शनात समावेश आहे. हे प्रदर्शन १५ फेब्रुवारीपर्यंत खुले राहणार आहे, अशी माहिती जयकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालिका डॉ. अपर्णा राजेंद्र यांनी केले आहे.अमृतमहोत्सवाच्या औचित्याने वर्षभरात विविध कार्यक्रम आयोजित करण्याची घोषणा विद्यापीठाकडून करण्यात आली होती. त्यासाठी व्यवस्थापन परिषदेचे सदस्य राजेंद्र विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्यात आली होती.आयोजित केले जाणार याची रुपरेषा समितीकडून वर्ष संपत येऊनही जाहीर करण्यात आली नाही.अमृतमहोत्सवी वर्षातील पहिले सहा महिने विद्यापीठात प्रभारी कारभार सुरू होता. त्यामुळे पहिल्या सहा महिन्यात उल्लेखनीय असे काही घडले नाही.

# शरदचंद्र पवार पक्षाचा लोकसभेचा पहिला उमेदवार ठरला

## राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी जाहीर केले

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
काही लोक गेले असले तरी नाउमेद होऊ नका, मतदार जागेवरच आहे. शरद पवार यांच्याबद्दल समाजात प्रचंड सहानभूती आहे. पवार यांचे नाव, तपश्चर्या असून त्याचा निवडणुकीत फायदा होईल. असा दावा करत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी शिरूर लोकसभा मतदार संघातून खासदार डॉ. अमोल कोल्हे हेच निवडणूक लढविणार असल्याचे जाहीर केले.आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पाटील यांच्या अध्यक्षतेखाली भोसरी विधानसभा मतदार संघाची आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी पाटील बोलत होते. शहराध्यक्ष तुषार कामठे, युवक प्रदेशाध्यक्ष महेबुब शेख, शहर युवक अध्यक्ष इम्रान शेख, महिला अध्यक्षा ज्योती निंबाळकर, माजी नगरसेवक गणेश भोंडवे, काशिनाथ नखाते, देवेंद्र तायडे, प्रवक्ते माधव



पाटील यावेळी उपस्थित होते.पाटील म्हणाले की, आपल्याकडे वेळ कमी आहे. त्यामुळे जास्तीत-जास्त मतदारांपर्यंत पोहचण्यासाठी बूथ कमिट्या सक्षम करा. बूथपर्यंत पोहोचत नाही तोपर्यंत आपणच आपली फसवणूक करून घेतो, असा त्याचा अर्थ होतो. गर्दी जमणे, माणसे गोळा होणे, हे महत्वाचे असून निवडणुकीत मतदारांपर्यंत पोहचणारे सैन्य नसेल तर पक्षाच्या प्रचाराला तळागळापर्यंत पोहचविण्याची क्षमता कमी होते. शिरूर लोकसभा मतदार संघातून डॉ. कोल्हे उभे राहणार आहेत. शरद पवार यांच्याबद्दल समाजात प्रचंड सहानभूती आहे. त्याचा कोल्हे यांना फायदा होणार आहे. परीक्षा जवळ आली असून संघटनेच्या कामाला गती द्यावी. नशीबाने जेवढे लोक मते देतील, असे राजकारण आम्ही कधी केले नाही. शरद पवार यांचे नाव, तपश्चर्या आहे, हे सगळे खरे असले तरी जमिनीवर काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी मतदारांच्या घरात जावून पेट्रोल, गॅस महागला हे सांगावे. ४६४ बूथ गुणिले चार हजार ६४० माणसे झाली तर शरद पवार यांची भोसरी विधानसभेत जाहीर सभा घेण्यात येईल. गटबाजी, एकमेकांचा मत्सर वाढायला लागला आहे. गटबाजी संपविली पाहिजे. पक्षाने एकदा निर्णय घेतला की त्याच्या पाठिशी रहावे, सर्वांनी एकमेकांशी प्रेमाने वागावे, असेही पाटील म्हणाले.

# अजित पवारांनी लावला थेट वैद्यकीय शिक्षण विभागाच्या सचिवांना फोन

## पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार शुक्रवारी पिंपरी-चिंचवड दौऱ्यावर

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

उपमुख्यमंत्री, पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार शुक्रवारी पिंपरी-चिंचवड दौऱ्यावर होते. त्यांनी महापालिकेच्या विविध विकासकामाची भूमिपूजन, उद्घाटने केली. यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात वैद्यकीय पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी रुग्णालयाच्या शेजारी उभारण्यात आलेल्या निवासस्थान इमारतीचे उद्घाटनही त्यांनी केले. वायसीएम रूग्णालयात पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यात



आला आहे. त्यानंतर आता रूग्णालय आवारात उभारण्यात आलेल्या ११ मजली इमारतीमधील दोन मजल्यावर नर्सिंग महाविद्यालय उभारण्यात येणार आहे. यासाठीचा प्रस्ताव महापालिकेच्या वैद्यकीय विभागाने राज्य सरकारच्या वैद्यकीय शिक्षण विभागाकडे पाठविला आहे. या प्रस्तावाची माहिती उपमुख्यमंत्री पवार यांना महापालिका आयुक्त सिंह यांनी दिली. त्यानंतर पवार यांनी तत्काळ वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव असलेले पिंपरी-चिंचवड महापालिकेचे तत्कालीन दिनेश वाघमारे यांना दूरध्वनी केला. तुम्ही माझ्यासोबत महापालिकेत आयुक्त म्हणून काम केले आहे. हे आपले काम आहे. नर्सिंग महाविद्यालय उभारण्याच्या सर्व मान्यता देऊन नस्ती सोमवारपर्यंत माझ्याकडे आली पाहिजे अशी सूचना केली. पिंपरी-चिंचवड शहरात दापोडी ते पिंपरीपर्यंत मेट्रो सुरू झाली आहे. मेट्रोवरून धावत असताना खाली रस्त्यावर कचरा, धुळ, रस्ता दुभाजकाचा रंग गेला आहे. याकडे लक्ष देण्याची सूचना पवार यांनी आयुक्तांना करत नाराजी व्यक्त केली. मात्र, त्यांनी ते मेट्रोकडे असल्याचे सांगितले. त्यावर मेट्रोचे महाव्यवस्थापक श्रावण हर्डीकर यांच्या कानावर हा विषय घालतो, असेही पवार म्हणाले. उपमुख्यमंत्री, पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार शुक्रवारी पिंपरी-चिंचवड दौऱ्यावर होते.

### विविध विकासकामाची भूमिपूजन

» महापालिकेच्या विविध विकासकामाची भूमिपूजन, उद्घाटने केली. यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात वैद्यकीय पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी रुग्णालयाच्या शेजारी उभारण्यात आलेल्या निवासस्थान इमारतीचे उद्घाटनही त्यांनी केले.वायसीएम रुग्णालयात पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यात आला आहे. त्यानंतर आता रूग्णालय आवारात उभारण्यात आलेल्या ११ मजली इमारतीमधील दोन मजल्यावर नर्सिंग महाविद्यालय उभारण्यात येणार आहे.

# कोरेगाव भीमा हिंसाचाराचा अहवाल लवकरच आटोपणार

## कोरेगाव भीमा येथे १ जानेवारी २०१८ मध्ये झाला होता हिंसाचार

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

कोरेगाव भीमा येथे १ जानेवारी २०१८ मध्ये हिंसाचार झाला होता. त्यानंतर राज्य सरकारने कलकत्ता उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश जे. एन. पटेल आणि निवृत्त मुख्य सचिव सुमित मलिक असा दोन सदस्यीय आयोग स्थापन केला. या आयोगाकडून मुंबई आणि पुण्यात साक्ष नोंदविणे, उलटतपासणी घेण्यात आली. मुंबईतील आयोगाचे कामकाज आटोपण्यात आले आहे.



पुण्यात आयोगाने विविध राजकीय नेते, प्रशासनातील अधिकारी, या भागातील ग्रामपंचायतींचे सरपंच, सदस्य, पोलीस अधिकारी आदी विविध जणांची साक्ष, उलटतपासणी घेण्यात येत आहे. सध्या आयोगाकडून पुण्यात एल्गार परिषदेच्या आयोजकांपैकी एक असलेल्या हर्षाली पोतदार यांची उलटतपासणी विशेष सरकारी वकील शिशिर हिरे हे घेत आहेत. सोमवारी (१२ फेब्रुवारी) वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर आणि त्यानंतर तत्कालीन हवेलीच्या प्रांताधिकारी आणि विद्यमान पुण्याच्या निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम यांना पाचारण करण्यात आले आहे. त्यानंतर आयोगाचे कामकाज संपणार आहे. आयोगाचे कामकाज अखेर फेब्रुवारीअखेर आटोपणार आहे. त्यामुळे या हिंसाचाराशी संबंधित सर्व पक्षकारांच्या वकिलांनी आपले युक्तीवाद लेखी स्वरूपात २९ फेब्रुवारीपर्यंत सादर करण्याचे आदेश आयोगाने दिले आहेत. याबाबतची नोटीस शुक्रवारी (९ फेब्रुवारी) आयोगाचे सचिव व्ही. व्ही. पळणीटकर यांनी प्रसृत केली. आयोगाकडून सुनावणी घेण्याचे कामकाज अंतिम टप्प्यात आहे. सर्व पक्षकारांच्या वकिलांनी त्यांचा युक्तीवाद लेखी स्वरूपात १ मार्चपूर्वी आयोगाकडे सादर करावा, असे नोटीसमध्ये नमूद करण्यात आले आहे. कोरेगाव भीमा येथे १ जानेवारी २०१८ रोजी घडलेल्या हिंसाचाराचा क्रम आणि त्यासाठी कारणीभूत असलेली परिस्थिती याची कारणमीमांसा करणे, ही घटना घडविण्यासाठी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या व्यक्ती किंवा व्यक्तींचा गट किंवा संघटना कारणीभूत होत्या किंवा कसे हे शोधणे, या घटनेमुळे निर्माण झालेली परिस्थिती हाताळण्यासाठी जिल्हा प्रशासनाने आणि पोलिस यंत्रणेने कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी केलेले नियोजन, तयारी पुरेशी होती काय?